मोटार अपघात नुकसान भरपाई अर्ज
क्र.६५/२०२१
जुना M.A.C.P. क्र.१५२/२०१०
सागर –वि.– पुरुषोत्तम
**निशाणी क्र. १०७**

**गैरअर्जदार क्र.१ तर्फे साक्षीदार क्रमांक १ याची जबानी**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

नाव– पुरुषोत्तम नामदेव खर्चे ,

वय– ७० वर्ष, व्यवसाय–शेती

राहणार– शेलगांव बाजार, ता. मोताळा, जि. बुलडाणा.

**सरतपास– गैअर्जदार क्र.१ तर्फे विधीज्ञ श्री. आर.व्ही.पाटील यांचेमार्फत शपथेवर सुरु...**

६. शपथपत्रातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर असून त्यावर माझी सही आहे.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास– अर्जदार तर्फे विधीज्ञ श्री.के.व्ही.परमार यांचेमार्फत सुरु...**

७. हे खरे नाही अपघात सायंकाळी सह ते साडेसहा वाजता झाला. अपघात घडला त्यावेळी मी घरी होतो. हे खरे आहे की त्यामुळे प्रतयक्ष अपघात कसा घडला ते मला माहीती नाही. हे खरे आहे की ट्रॅक्टर चालक हा माझा मुलगा आहे. त्याच्याकडे ट्रॅक्टर चालवण्याचा परवाना आहे. या प्रकरणात तो परवाना दाखल आहे किंवा कसे ते मला माहीती नाही. मी ट्रॅक्टरचा विमा संपण्याअगोदर विमा कंपनीच्या साहेबांना नुतनीकरण करण्यासाठी पैसे दिले होते पण तो नुतणीकरण करुन घ्यायचे राहीले. माझ्या मुलाचे नांव प्रशांत आहे. माझा मुलगा हा अर्जदार पेक्षा एक ते दोन वर्षांनी मोठा आहे. माझ्या मुलाचे लग्न झाले आहे. हे खरे आहे की अर्जदाराचे आज पर्यन्त लग्न झालेले नाही.

८. हे खरे नाही की माझे आणि अर्जदाराची आर्थीक परिस्थीती समाधानी आहे. हे खरे नाही की, अर्जदाराचे लग्न तो अपंग आहे म्हणून झाले नाही.

९. अर्जदाराने खोटी केस केली म्हणून त्यांचे विरुध्द मी आज पर्यन्त कोठेही तक्रार केली नाही. अर्जदाराने आमच्या विरुध्द केस केली आहे हे आमच्या घरच्यांना माहीती आहे. हे खरे आहे की माझा मुलगा प्रशांत याने या प्रकरणात सामील करण्यासाठी स्वतःहुन अर्ज दिलेला नाही.

१०. हे खरे आहे की, सागर हा त्याच्या वडीलांना एकुलता ऐक मुलगा आहे. हे खरे नाही की, अर्जदार हा घटना घडली त्यावेळी इंजीनिअरिंगचे शिक्षण घेत होता. हे खरे नाही की अपघातामुळे तो पुढचे शिक्षण पुर्ण करु शकला नाही. हे खरे नाही की, अर्जदार हा सर्वसामान्य मानसासारखा काम करु शकत नाही. हे खरे नाही की, अपघाताच्या वेळी तो शिक्षणाव्यतिरिक्त वर्कशॉप मधे काम करुन दरमहा रुपये ३०००/– रुपये मिळवत असे. हे खरे नाही की, अर्जदार इंजिनिअर झाला असता तर दरमाह रुपये ६००००/– वेतन मिळवू शकला असता. हे खरे नाही की, अपघातामध्ये पाय गमावला गेल्यानपे त्याचा मानसिक त्रास भोगत आहे. हे खरे नाही की, अपघातास माझा मुलगा कारणीभूत आहे. हे खरे नाही की, सागर यास नुकसान भरपाई मिळू नये म्हणून तो इंजिनिअरींग करत नव्हता व उत्पन्न मिळवत नव्हता असे खोटे सांगत आहे. हे खरे नाही की अर्जदाराची स्वतःची अपघातामध्ये चुकी होती असे खोटे सांगत आहे. हे खरे नाही की मी खोटा बचाव घेतला व खोटा पुरावा दिला.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वा./–

दिनांक : ०६/०२/२०२४

**(एस.व्ही.जाधव)**
तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ तथा
सदस्य मोटार वाहन अपघात प्राधीकरण मलकापूर.

वाचुन दाखवले बरोबर आहे असे साक्षीदाराने सांगितले. (साक्षीपुरावा केवळ मराठी भाषेत नोंदविण्यात आला.)

स्वा./–

दिनांक : ०६/०२/२०२४

**(एस.व्ही.जाधव)**
तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ तथा
सदस्य मोटार वाहन अपघात प्राधीकरण
मलकापूर.